MHKO170000161992

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ५/१९९३.**

वसंत बाबु कांबळे मयत वारस शकुंतला वसंत कांबळे
विरुध्द
रामचंद्र दादु कांबळे

## निशाणी १५३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ४ सौ.गंगुबाई बाबु रणभिसे यांचे नांव दावेतून कमी करणेत यावे याकरीता दाखल केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द वाटपासाठी दाखल केलेला असून प्रस्तुत दावेतील प्रतिवादी क्र. ४ गंगुबाई बाबु रणभिसे या दिनांक १४.०७.२०१२ रोजी मयत झालेल्या आहेत तसेच त्यांची वारस मुलगी मंगल बकुल पन्हाळाकर ही देखील २८.१०.२०२२ रोजी मयत झालेली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ चे नांव कमी करणेत यावे अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे त्याच अर्जावर दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे तसेच अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

३. अर्ज, म्हणणे व दाव्याचे अवलोकन केले. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.४ हे दिनांक १४.०७.२०१२ रोजी मयत झाले आहेत. तसेच प्रतिवादी क्र.४ ची वारस मुलगी मंगल देखील मयत झालेली आहे. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ४ चे नांव कमी करणेबाबत आहे. प्रतिवादींनी जरी प्रस्तुत अर्जास हरकत घेतली असली तरी वादीने दाखल केलेल्या प्रतिवादी क्र.४ च्या मृत्यु दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.४ दिनांक १४.०७.२०१२ व त्यांची मुलगी मंगल बकुल पन्हाकर ही दिनांक २८.१०.२०२२ रोजी मयत असलेचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ४ चे नांव कमी करणेबाबत असलेमुळे दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. ४ चे नांव कमी केल्यामुळे इतर प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही उलटपक्षी न्यायदानास

मदतच होणार आहे.  त्यामुळे सदरचा अर्ज  मंजूर करणे योग्य व न्यायोचीत होईल. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीनी प्रतिवादी क्र.४ गंगुबाई बाबु रणभिसे  ह्यांचे नांव दावेतून कमी करुन तशी दुरुस्ती प्रत सदर कामी त्वरीत दाखल करावी.

पन्हाळा.
दिनांक  ०३.०२.२०२५.

श्रीमती व्ही.आर.माने,
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा.